# राज्य माहिती आयोग, नाशिक खंडपीठ

(पिनॅकल मॉल,४ था मजला, त्र्यंबक नाका सिग्नलजवळ, जुना आग्रा रोड, नाशिक ४२२००२)

---

**माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या कलम १९(३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपिल क्र. रामाआ-नाशिक/व्दितीय अपिल क्र.११/२०२४/जळगाव**

| अपिलार्थी | प्रतिवादी | |
|---|---|---|
| | जन माहिती अधिकारी | प्रथम अपिलीय अधिकारी |
| श्री. दिलीपकुमार हिराचंद जैन, रा. सराफ बाजार, भवानी पेठ जळगाव, ता.जि. जळगाव | पोलीस उपअधीक्षक (मुख्यालय), पोलीस अधीक्षक, जळगाव यांचे कार्यालय, जळगाव, ता.जि. जळगाव | अप्पर पोलीस अधीक्षक, अप्पर पोलीस अधीक्षक, जळगाव यांचे कार्यालय, जळगाव, ता.जि. जळगाव |

**सुनावणी दिनांक – २६/०९/२०२५**

**१. उपस्थिती –**

| अपीलार्थी | विद्यमान जन माहिती अधिकारी | तत्कालीन जन माहिती अधिकारी | विद्यमान प्रथम अपीलीय अधिकारी | तत्कालीन प्रथम अपीलीय अधिकारी |
|---|---|---|---|---|
| अनुपस्थित | अनुपस्थित | अनुपस्थित | प्रतिनिधी उपस्थित | अनुपस्थित |

**२. द्वितीय अपील अर्ज –**

(१) द्वितीय अपील अर्जाचा दिनांक : २९/१२/२०२३

(२) द्वितीय अपील अर्जात नमूद केलेली कारणे : जन माहिती अधिकारी यांनी मागितलेली माहिती पुरविण्याची जबाबदारी असतांना देखील माहिती पुरविलेली नाही. काहीही आदेश मिळालेला नाही.

(३) द्वितीय अपील अर्जान्वये केलेली विनंती : जन माहिती अधिकारी यांचेवर कायदेशीर कारवाई व्हावी. माहिती मिळावी.

**३. माहिती अर्ज –**

(१) माहिती अर्जाचा दिनांक : ०८/०८/२०२३

(२) माहिती अर्ज प्राप्त झाल्याचा दिनांक : ०८/०८/२०२३

(३) कोणत्या कालावधीची संबंधित माहिती हवी आहे तो कालावधी : ता.२३/०५/२०२३

**(४) जन माहिती अधिकारी यांचेकडे मागणी केलेली माहिती :**

१) Ramanand Police Station Jalgaon २०/०५/२३ ते ता.२३/०५/२०२३ रोजी पंचनामा करुन पुढील प्रमाणे सोने जप्त केले त्याबाबतची माहिती. (२) आपण राजमल लखीचंद यांचेकडून अंदाजे ४५ ग्रॅम सोने जप्त केले त्याबाबतची माहिती. (३) आपण आर.सी.बाफणा यांचेकडून ११५ ग्रॅम सोने जप्त केले त्याबाबतची माहिती. (४) गणेश दापोरेकर सराफ यांचेकडून ५० ग्रॅम सोने जप्त केले त्याबाबतची माहिती. (५) हर्षल नंदुरबारकर सराफ यांचेकडून १२५ ग्रॅम सोने केले त्याबाबतची माहिती. (६) तसेच या कामातील सर्व लोकांच्या एफ.आय.आर. ची व पंचनामा कॉपी द्यावी. तसेच आरोपींचा जाबजबाब, कलम २७ प्रमाणे सी.सी.टी.व्ही. फुटेज या सर्व दस्तांच्या प्रती मिळाव्यात. (७) जप्त केलेल्या सोन्यापैकी किती सोने न्यायालयात जमा केले त्या बाबतची माहिती. वरील सर्व माहिती लेखी स्वरुपात मिळावी तसेच दस्तांच्या प्रती मिळाव्यात.

**(५) जन माहिती अधिकारी यांनी माहिती अर्जाच्या अनुषंगाने केलेली कार्यवाही :**

सदर माहिती अर्जाच्या अनुषंगाने तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा पोलीस उपअधीक्षक (मुख्यालय), पोलीस अधीक्षक, जळगाव यांचे कार्यालय, जळगाव, ता.जि. जळगाव यांनी दि.१०/०८/२०२३ रोजीच्या पत्रान्वये अपीलार्थी यांचा माहिती अर्ज माहिती अधिकार अधनियम २००५ कलम ६ (३)(२) अन्वये जन माहिती अधिकारी तथा पोलीस निरीक्षक, रामानंद नगर पोलीस स्टेशन यांच्या कार्यालयाकडे वर्ग करण्यात आल्याचे दिसून येते.

**४. प्रथम अपील -**

| | | |
|---|---|---|
| (१) प्रथम अपील अर्जाचा दिनांक | : | २३/०९/२०२३ |
| (२) प्रथम अपिल अर्ज प्राप्त झाल्याचा दिनांक | : | २६/०९/२०२३ |
| (३) प्रथम अपील दाखल करण्याचे कारण | : | मागितलेली माहिती पुरविण्याची जबाबदारी असतांना देखील माहिती पुरविलेली नाही. |

**(४) अपीलीय अधिकारी यांनी प्रथम अपील अर्जाच्या अनुषंगाने केलेली कार्यवाही :**
अपीलार्थी यांनी दाखल केलेल्या प्रथम अपील अर्जावर तत्कालीन प्रथम अपीलीय अधिकारी तथा उपविभागीय पोलीस अधिकारी, जळगाव उपविभाग, जळगांव यांनी दि.०६/१०/२०२३ रोजी सुनावणी घेऊन त्यामध्ये अपीलार्थी यांनी मागणी केलेली माहिती जन माहिती अधिकारी रामानंदनगर पोलीस स्टेशन यांनी १० दिवसांत समक्ष विनामुल्य पुरवावी. अपीलार्थी यांनी माहिती अधिकार अर्जात मागणी केलेली माहिती ही जन माहिती अधिकारी रामानंदनगर पो.स्टे. यांचेकडून समक्ष हजर राहून प्राप्त करुन घ्यावी, असे नमूद करुन प्रथम अपील निकाली काढण्यात आल्याचे दिसून येते.

**५. युक्तिवाद/लेखी खुलासा –**

१) विद्यमान प्रथम अपीलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी - तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा पोलीस उपअधीक्षक (मुख्यालय), पोलीस अधीक्षक, जळगाव यांचे कार्यालय, जळगाव, ता.जि. जळगाव यांनी दि.१०/०८/२०२३ रोजीच्या पत्रान्वये अपीलार्थी यांचा माहिती अर्ज माहिती अधिकार अधनियम २००५ कलम ६ (३)(२) अन्वये जन माहिती अधिकारी तथा पोलीस निरीक्षक, रामानंद नगर पोलीस स्टेशन यांच्या कार्यालयाकडे वर्ग करण्यात आल्याचे दिसून येते. तसेच अपीलार्थी यांनी मागणी केलेली माहिती गुन्ह्याच्या संदर्भातील आहे. त्यामुळे सदरची माहिती देय होत नाही.

**६. निष्कर्ष –**

१) तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा पोलीस उपअधीक्षक (मुख्यालय), पोलीस अधीक्षक, जळगाव यांचे कार्यालय, जळगाव, ता.जि. जळगाव यांनी दि.१०/०८/२०२३ रोजीच्या पत्रान्वये अपीलार्थी यांचा माहिती अर्ज जन माहिती अधिकारी तथा पोलीस निरीक्षक, रामानंद नगर पोलीस स्टेशन यांच्या कार्यालयाकडे वर्ग करण्यात आल्याचे दिसून येते.

२) अपीलार्थी यांनी मागणी केलेली माहिती गुन्ह्याच्या संदर्भातील असल्याने सदर माहिती देय होत नसल्याचे दिसून येते.

३) अपीलार्थी द्वितीय अपील सुनावणीस अनुपस्थित असल्याचे दिसून येते.
सबब, या प्रकरणी आयोग खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

## आदेश

१. तत्कालीन प्रथम अपीलीय अधिकारी तथा उपविभागीय पोलीस अधिकारी, जळगाव उपविभाग, जळगांव यांनी दि.०६/१०/२०२३ रोजी सुनावणी घेवून पारित केलेले प्रथम अपील आदेश रद्द करण्यात येत आहे.

२. प्रस्तुत व्दितीय अपिल क्र.११/२०२४/जळगाव निकाली काढण्यात येत आहे.

(भुपेंद्र गुरव)
राज्य माहिती आयुक्त
खंडपीठ नाशिक.

जावक क्र. ८४८८

दिनांक : 12 DEC 2025